आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी३.०० वाजता

२८ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री जनधन योजनेला आज एक दशक पूर्ण/ प्रधानमंत्र्यांनी केलं लाभार्थ्यांचं अभिनंदन

- मालवणजवळ राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या निषेध मोर्चादरम्यान तणाव

- १७ व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि अंतराळभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूची १ सुवर्ण आणि ४ रौप्यपदकांची कमाई

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**आणि**

- ज्येष्ठ मराठी अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

प्रधानमंत्री जनधन योजनेला आज 'एक दशक' पूर्ण झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २८ ऑगस्ट २०१४ रोजी, ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ५३ कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेच्या दशकपूर्ती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाभार्थ्याचं अभिनंदन केलं असून ही योजना यशस्वी केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. आर्थिक समावेशन आणि महिला – युवकांचं, सक्षमीकरणाच्या प्रयत्नांमधे जनधन योजनेचा महत्त्वाचा वाटा असल्याचं, मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

हा जगातला सर्वात मोठा 'वित्तीय समावेशन उपक्रम' असून, अर्थ मंत्रालय, यामाध्यमातून उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आधार देण्याचा प्रयत्न सातत्यानं करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी३.०० वाजता

२८ ऑगस्ट २०२४ - बुधवार

<><><><>

मालवण राजकोट इथं कोसळलेल्या पुतळ्याची पाहणी करण्यासाठी आज तिथं गेलेले शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि भाजपा नेते नारायण राणे यांच्या समर्थकांनी एकमेकांवर दगडफेक केली. यात एक पोलीस आणि एक महिला असे दोघे जखमी झाले.

आज महाविकास आघाडीनं मालवण बंदची हाक दिली होती, त्याला मालवण मध्ये शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. मालवणची पूर्ण बाजारपेठ आज बंद होती. महाविकास आघाडीचा मोर्चाला सकाळी सुरु झाला. या मोर्च्यात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि अंबादास दानवे, तसंच आदित्य ठाकरे, जयंत पाटील हे सहभागी झाले होते. महाविकास आघाडीचे पदाधिकारी, आणि भाजपा नेते निलेश राणे तसंच त्यांचे समर्थक राजकोट इथं एकमेकांसमोर येताच दोन्ही बाजूकडून दगडफेक सुरू झाली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. पण मालवणमध्ये तणावपूर्ण वातावरण असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><>

राजकोट किल्ल्यातला छत्रपती शिवाजी महारांजाचा पुतळा कोसळणं ही घटना संतापजनक आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडी येत्या रविवारी मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथं आंदोलन करणार असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. महाविकास आघाडीतर्फे आज मालवणात मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले उपस्थित होते. जोरदार वाऱ्यामुळे पुतळा कोसळण्याची घटना कधीही घडली नसून स्मारकाच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचं आरोप त्यांनी केला.

<><><><>

या पुतळ्याचे शिल्पकार जयदीप आपटे आणि बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नौदलाच्या दोन

अधिकाऱ्यांनी काल मालवणला भेट देऊन पहाणी केली. या पुतळ्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागानं २० ऑगस्ट रोजी नौदलाला पत्र लिहून पाऊस आणि खाऱ्या वाऱ्यांमुळं पुतळ्याची जोडणी गंजल्याची बाब अधोरेखित केली होती. दरम्यान या प्रकाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं आज मालवण बंदची हाक दिली आहे.

**<><><><><>**

एनटीएफ अर्थात राष्ट्रीय कृती दलाची दुसरी बैठक आज नवी दिल्लीत झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय गृह सचिव आणि केंद्रीय आरोग्य सचिव होते तर सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक बैठकीत दूरदृष्यप्रणालीमार्फत सहभागी झाले . वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी तात्काळ करण्याच्या उपाययोजनांविषयी चर्चा झाली. राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक काल कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झाली. या बैठकीत विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा झाली असून कृती दलाच्या सदस्यांनी आपली मतं मांडली. वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्या संदर्भात तीनशे ते चारशे सूचना मिळाल्याचं कृती दलाच्या सदस्यांनी सांगितलं. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं ‘Suggestions to NTF’ नावाचं पोर्टल तयार केलं असून त्यावर सूचना मागवल्या आहेत.

**<><><><><>**

संयुक्त संसदीय समितीने वक्फ सुधारणा विधेयक २०२४ वर जनता, एनजीओ, तज्ज्ञ आणि संस्थांकडून मतं आणि सूचना मागवल्या आहेत. लोकसभा सचिवालयाच्या प्रसिद्धीपत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. लेखी सूचना इंग्रजी किंवा हिंदी भाषेत jpcwaqf-lss@sansad.nic.in या संकेतस्थळावर पाठवाव्यात असं सचिवालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. तसंच **संयुक्त सचिव, लोकसभा सचिवालय, रूम क्रमांक ४४०, संसद भवन, नवी दिल्ली** या पत्त्यावरही सूचना पाठवता येतील, असं सांगण्यात आलं आहे. या सूचना पंधरा दिवसांच्या आत पाठवायच्या आहेत. या सूचना गोपनीय ठेवल्या जातील तसंच समितीकडून त्यांची नोंद घेतली जाईल. ज्यांना समितीसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून मत मांडायचं असेल त्यांनी पत्र किंवा ईमेल मध्ये तसं सूचित करावं, मात्र याबाबत अंतिम निर्णय समितीचाच असेल असं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

वक्फ सुधारणा विधेयक अर्थसंकल्पीय अधिवेशनात संसदेत मांडण्यात आलं होतं. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आलेल्या संसदेच्या संयुक्त समितीकडे ते परीक्षणासाठी पाठवण्यात आलं आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ही समिती यासंबंधीचा अहवाल संसदेत सादर करणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. यंदा देशभरातील ५० शिक्षकांना या पुरस्कारांनं सन्मानित करण्यात येणार आहे; यात महाराष्ट्रातल्या दोन शिक्षकांचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील आदिवासीबहुल जाजावंडी इथल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक मंतय्या बेडके; तसंच कोल्हापूरच्या स. म. लोहिया माध्यमिक शाळेतील कलाशिक्षक सागर बगाडे यांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. बगाडे यांनी पुरस्कार जाहीर झाल्यावर आकाशवाणीला प्रतिक्रीया दिली.....

**बाईट- सागर बगाडे**

येत्या पाच सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

**<><><><><>**

१७व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूनं १ सुवर्ण आणि ४ रौप्यपदकांना गवसणी घातली आहे. १७ ते २६ ऑगस्टदरम्यान ब्राझिलची राजधानी रिओ दी जानेरो इथं झालेल्या या स्पर्धेत बंगळुरूचा दक्ष तयालिया यानं सुवर्ण, तर पुण्याचे आयुष कुठारी आणि सानिध्य सराफ, हैदराबादचा बानीब्रत माजी आणि बिहारचा पाणिनी या चौघांनी रौप्यपदकाची कमाई केली. पदकतालिकेत भारत आठव्या स्थानी राहिला. इंदोरच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे प्राध्यापक भार्गव वैद्य आणि मुंबईच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे प्रितेश रणदिवे यांनी या चमूचं नेतृत्व केलं. पुढची खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धा मुंबईत होणार आहे.

<><><><><>

दिव्यांगांसाठीच्या पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून पॅरीस इथं सुरुवात होत आहे. या स्पर्धा येत्या ८ सप्टेंबर पर्यंत चालणार आहेत. एकूण २२ क्रीडाप्रकारांचा स्पर्धेत समावेश असून त्यातल्या १२ खेळांमधे भारताचा ८४ जणांचा संघ सहभागी होणार आहे. आतापर्यंतचा हा सर्वात मोठा पॅरालिंपिक संघ आहे. पॅरा सायकलिंग, पॅरा ज्युडो आणि पॅरा रोइंग या प्रकारांत प्रथमच भारतीय क्रिडापटू आपलं कौशल्य अजमावणार आहेत. २०२० मध्ये झालेल्या टोकिओ ऑलिंपिकचा सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू सुमित अंतिल आणि अथलीट भाग्यश्री जाधव उद्घाटन सोहळ्यात भारताचे ध्वजवाहक असतील.

<><><><><>

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांच्या पार्थिवावर आज पुण्याच्या वैकुंठधाम स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. काल पुण्यात निधन झालं. त्या ८१ वर्षांच्या होत्या. नाटक, चित्रपट, मालिका या सर्व क्षेत्रात आपल्या समर्थ अभिनयानं त्यांनी अनेक दशकं प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं. त्यांनी वयाच्या ११व्या वर्षापासून कलाक्षेत्रात काम करायला सुरुवात केली. बेबंदशाही या नाटकातून त्यांनी रंगभूमीवर पदार्पण केलं. माहेरचा आहेर', मानाचं कुंकू, कथा, आज झाले मुक्त मी, आईशप्पथ, चिरंजीव, अग्निपरीक्षा, धग, आम्ही दोघे राजाराणी, बाईसाहेब अशा असंख्य चित्रपटांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. याशिवाय 'कथा अकलेच्या कांद्याची', 'राजकारण गेलं चुलीत', सासूबाईचं असंच असतं' अशा अनेक नाटकांमध्ये सुद्धा त्यांनी काम केलेलं आहे. सिंघम या हिंदी चित्रपटात ही त्यांनी काम केलं होते. कला क्षेत्रातल्या योगदानाबद्दल दोन वर्षांपूर्वी त्यांना राज्य शासनाच्या नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. देशपांडे यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

//<><><><><>//